## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

**तक्रार क्रमांक : १०३७/२०२१**

**तक्रारकर्ता,** श्री.प्रणय गुरुनाथ पाटील
मु.चिंचघर, पो.कुडूस,
ता.वाडा, जि.पालघर ४२१ ३१२.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय चिंचघर,
ता.वाडा, जि.पालघर.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय चिंचघर,
ता.वाडा, जि.पालघर.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ०७.०८.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| १७.०९.२०१९ | -- | ०२.११.२०१९ | २८.११.२०१९ |

तक्रारकर्ता यांनी दि. ०५.०३.२०२० रोजीच्या अर्जान्वये *"माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही."* असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ०७.०८.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता व प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*"सन २०१८ ते २०१९ कालावधीतील १५ टक्के रक्कमेची माहिती मिळणेबाबत.*

*१) एकूण रक्कम किती.*
*२) खरेदी किती.*
*३) लाभार्थी किती व त्यातील अनुसुचित जाती व जमातीचे लाभार्थी किती व त्यांची पूर्ण यादी मिळावी.*
*४) खरेदीदार संस्था कोणती व तीचा पूर्ण तपशिल व तीचा बिल (पावती)*
*५) कॅश बुकची प्रत मिळावी.*
*६) ग्रामपंचायतीच्या बँकेतील पासबुकाच्या स्टेटमेंट प्रती मिळाव्यात.*
*७) या व्यवहारामधील सर्व बिल (पावती) त्यांचया प्रती मिळाव्यात."*

तक्रारकर्ता व जन माहिती अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे तक्रार अर्जावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या तक्रार अर्जासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना विहित मुदतीत तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतरही माहिती दिलेली नाही. यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

तसेच, आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **तक्रारकर्ता यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.उज्वला जाधव तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, चिंचघर, ता.वाडा, जि.पालघर यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक ०३.१०.२०१९ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून, आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२१.१०.२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०७ ऑगस्ट, २०२४ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.उज्वला जाधव तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय चिंचघर,
ता.वाडा, जि.पालघर.

**- यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय चिंचघर,
ता.वाडा, जि.पालघर. **यांचेमार्फत रवाना.**

## सुनावणी दिनांक २१.१०.२०२४ ( In Continuation of order dt.०७.०८.२०२४)

### विवेचन

उपरोक्त दि.०७.०८.२०२४ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविणेबाबत व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये याबाबतचे स्पष्टीकरण सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २१.१०.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

सदर प्रकरणी तक्रारकर्ता यांनी सुनावणी दरम्यान असे सांगितले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तक्रारकर्ता यांना आयोगाच्या आदेशानंतर देखिल माहिती पुरविली नाही. यामुळे वि.मान जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.उज्वला जाधव, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, चिंचघर यांना आयोगाने माहिती पुरविणेस झालेल्या विलंबाबत खुलासा सादर करणेबाबत निर्देश दिले होते. तथापि त्यांनी कोणताही खुलासा सादर केलेला नाही. तसेच त्या आजच्या सुनावणीसही अनुपस्थित आहेत. यावरुन त्यांना कोणताही खुलासा सादर करावयाचा नाही हे स्पष्ट होते.

वरील वस्तुस्थिती विचारात घेवून खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

### आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, चिंचघर, ता.वाडा, जि.पालघर यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक ०३.१०.२०१९ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन आयोगाच्या आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये रु.२५,०००/- इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्यावेळी आयोगाकडे सादर

करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम.उज्वला जाधव, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, चिंचघर यांनी आयोगाकडे त्यांचा कोणताही खुलासा सादर केलेला नाही. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना याच अपिलार्थी यांच्या दुसऱ्या एका प्रकरणामध्ये शास्ती आकरण्यात आलेली असल्यामुळे, याप्रकरणात त्यांचेवर शास्ती लादण्यात येत नाही. त्यांचेवरील प्रस्तावीत शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०९.१२.२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजता घेण्यात येईल.

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ ऑक्टोबर, २०२४ .
**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
विद्यमान जन माहिती अधिकारी, ग्रामसेवक,
ग्रामपंचायत चिंचघर, ता.वाडा, जि.पालघर.

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ